इतर फौजदारी किरकोळ अर्ज क्र. १०/२०२१ मधील
नि. ०४ वरील आदेश
(कृतज्ञा गावडे व.२ पूर्वाश्रमीची कृतज्ञा परब– अर्जदार वि.
शिवराम सुभाष गावडे–सामनेवाला )

अर्जदार हिने प्रस्तुतचा अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण करणारा अधिनियम २००५ चे कलम २३ अन्वये अंतरिम पोटगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. अर्जदार हिचे कथन की, अर्जदार नं.१ व सामनेवाला नं. १ यांचा विवाह दिनांक ०५/०५/२०१५ रोजी मौजे हेदुळ, ता. मालवण येथे झाला. सामनेवाला क्र.१ हा सध्या आय. टी. कंपनीत कामाला असून सामनेवाल नं. २ हे महानगर पालिका, मुंबई येथून सेवानिवृत्त झाले असून ते १ लक्झरी व इनोव्हाचे मालक आहेत. अर्जदार नं. १ ही स्टाफ नर्स आहे. त्यांच्या विवाह संबंधातून सामनेवाला नं. २ याचा जन्म झाला आहे. मध्यंतरीच्या काळात सामनेवाला क्र.१ हा शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतवत असे तसेच तो नाटकात काम करतो असे अर्जदार हिच्या लक्षात आले. त्यावेळी अर्जदार नं. १ हि सामनेवाला नं. १ ला शेअर मार्केटमध्ये पैसे टाकु नकोस, पैसे जपुन वापर असे सांगण्याचा प्रयत्न करत असे. त्यावेळी तो भांडण करत असे व अर्जदार हिस ''मला तुझी गरज नाही मला घटस्फोट दे'' असे सांगत असे.

३. अर्जदार हिचे पुढे असे कथन की , अर्जदार नं. २ याचा जन्म झाल्यानंतर अर्जदार नं.१ हिस सहा महिने सुट्टी असल्याने ती सासु –सास– यासोबत मौजे हेदुळ येथे रहाण्यास आली. त्यावेळी अर्जदारा नं.१ हिला जेवण नाष्टा व्यवस्थित मिळत नसे. त्यावेळी अर्जदार नं. १ हिला माहेरी जायचे होते.

परंतु तिला सासुने माहेरी पाठवले नाही . त्यानंतर सामनेवाला हा गांवी आल्यानंतर अर्जदार नं.१ हि माहेरी कसाल येथे रहाण्यास आली . त्यावेळी अर्जदार नं.१ हिचेसोबत सामनेवाला नं.१ हा फोनवरुन भांडण करत असे. अर्जदार नं.१ हि तिचे माहेरी असताना तिचे सासरी हेदुळ येथे पुजा होती . त्यावेळी ती पुजेसाठी सासरी आला असताना सामनेवाला नं .१ हा तिचेशी बोलला नाही व अर्जदार नं. २ ला जवळ देखील घेतले नाही. त्यानंतर अर्जदार नं.१ हिने सामनेवाला क्र.१ यास तिचा ड्रायव्हींगचा क्लास चालू असून तिचे लर्निंग लायसनचे काम झाल्यानंतर ती मौजे हेदुळ येथे येईल, तोपर्यंत ती माहेरी राहिल असे सांगितले. त्यावेळी सामनेवाला क्र. १ याने अर्जदार हिचेशी भांडण केले व दुस–या दिवशी सकाळी त्याच्या आई वडीलांना बोलावून मोठ्या प्रमाणावर भांडण केले व ''मला घटस्फोट दे, मी मुंबईला जावून घटस्फोट अर्ज दाखल करणार'' असे सांगू लागला. त्यानंतर चार दिवसांनी सामनेवाला नं.२ याने अर्जदार नं.१ हिस सांगितले की, ''आम्ही ओरोस येथे फ्लॅट बुक केलाय, तुझ्या नांवावर लोन कराव लागेल. फ्लॅट तुझ्या नांवावर घ्यायचा आहे. '' परंतु खरेदीखताचेवेळी तिचेसोबत सामनेवाला नं. १ याने आपलेही नांव घातले. त्यानंतर जुन २०१६ मध्ये अर्जदार नं. १ ही पुन्हा मुंबईला गेली . त्यानंतर देखील तिला सासु व नणंदेकडून त्रास चालुच होता. त्यानंतर सन २०१७ मध्ये अर्जदार क्र.१ हिने खराब झालेली प्लॅस्टीकची बरणी फेकून दिल्याच्या कारणावरुन तिचे सासुशी भांडण झाले व त्याचा राग येवून सामनेवाला नं. १ ने अर्जदार नं.१ हिचे कपाटातून सर्व कपडे, बॅग्ज बाहेर काढुन फेकुन दिल्या व आताच्या आता बाहेर चालती हो'' असे सांगू लागला व तिला मारु लागला. तसेच त्यावेळी तिने अर्जदार नं. २ यास देखील मारले. त्यानंतर दुस–या दिवशी सामनेवाला क्र. १ याने अर्जदार नं. १ हिचे वडीलांना फोन

करुन सांगितले की, '' तुमच्या मुलीला नांदावयाचे नाही , मला घटस्फोट पाहिजे.'' त्यावेळी अर्जदार नं.१ चे वडीलांना देखील हे ऐकून धक्का बसला. अर्जदार हिचे आई वडीलांनी त्याला समजावण्याचा प्रयत्न केला. परंतु समजुन घेण्याच्या मनस्थितीत नव्हता.

४. सामनेवाला नं. १ चा भाऊ व विवाहित बहिण देखील त्यांच्यासोबत रहात होती. परंतु ते कोणतीही आर्थिक मदत करत नसत. त्यामुळे संपूर्ण घराचा खर्च हा अर्जदार नं. १ हिस करावा लागत होता. तसेच सामनेवाला नं. २ हा अर्जदार नं. १ कडे अधून मधून पैशाची मागणी करत असे . त्यावेळी ती आपल्या सेव्हिंगमधील पैसे काढून सुध्दा त्यांना देत असे. त्यानंतर सामनेवाला नं. १ चा भाऊ नितेश यास तो बेकार असल्याने गाडी घेवून द्यायचे ठरले . त्यावेळी अर्जदार नं. १ हिने त्यांना कर्ज काढून रक्कम रुपये २,००,०००/- दिले व सामनेवाला नं. २ यांनी तिचे मंगळसुत्र गहाण ठेवून रक्कम रुपये ८०,०००/- घेतले. त्याबाबत अर्जदार नं. १ हिने विचारले असता सामनेवाला नं. २ यांनी तिचेशी बोलणे बंद केले. त्यानंतर सामनेवाला क्र. १ ने त्याच्या कंपनीत रक्कम रुपये २५,००,०००/- इतक्या रक्कमेचा अपहार केला . त्यामुळे त्याची नोकरी गेली . त्यावेळी अर्जदार नं. १ ने त्याला कर्ज काढून, तिचे सेव्हिंगमधील तसेच मैत्रिणीकडून घेवून एकूण रक्कम रुपये २३,००,०००/- दिले. त्यानंतर अर्जदार क्र. १ हिने अर्जदार नं. २ यासं कांजुरमार्ग येथे शाळेत घातले व तिचे आई वडीलांसोबत कांजुरमार्ग येथे भाड्याचे घरात राहू लागली. सामनेवाला नं. १ हा तेथे आला नाही. त्यानंतर अर्जदार नं. १ ने सामनेवाला क्र. १ यास फोन करुन पैशाची मागणी केली त्यावेळी तो पैसे देण्यास टाळाटाळ करु लागला . त्यानंतर २ डिसेंबरला

सामनेवाला नं. १ याने अर्जदार हिला फोन करुन तिचेकडे दागिने मागितले . परंतु तिने दागिने देण्यास नकार दिला. त्यावेळी सामनेवाला नं. १ याने तिला '' तु मला दिलेले पैसेही तुला परत मिळणार नाहीत'' असे सांगून मारण्याची धमकी दिली.

५. अर्जदार नं. १ चे पुढे असे कथन आहे की, अर्जदार न.१ ही अत्यंत आर्थिक अडचणीत आली आहे. त्यामुळे तिने महिला अत्याचार निवारण कक्ष ओरोस येथे अर्ज दिला. त्याठिकाणी चर्चा होवून सामनेवाला क्र.१ याने सर्व गोष्टी कबुल केल्या व ओरोसचा फ्लॅट अर्जदार नं. १ चे नांवे करुन देतो असे सांगितले व तिने तो फ्लॅट विकून कर्ज फेडावे व पैसे कमी पडल्यास तो जादा पैसे देणार असे कबुल केले. परंतु सामनेवाला क्र.१ हा ठरल्याप्रमाणे वागण्यास टाळाटाळ करु लागला. त्यानंतर अर्जदार नं.१ याने सामनेवाला नं. १ यास वारंवार फोन केला असता तो फोन घेत नसे व अर्जदारशी बोलत नसे. त्यानंतर दिनांक ०९/०५/२०२१ रोजी अर्जदार नं.१ हिने फोन केला असता त्याने तिला सांगितले की, '' मी ओरोस मधील फ्लॅट खाली करणार नाही, तु पोलिसात जा, तुझ्यात दम असेल तर तु फ्लॅट घेवून दाखव.'' अर्जदार नं.१ हिला पगारातुन हप्ते भरणे कठीण झाले आहे . तिचे फार मोठ्या प्रमाणावर शारीरीक, आर्थिक व मानसिक शोषण झाले आहे. सामनेवाला नं.१ हा सध्या आय. टी. कंपनीत नोकरीस असून त्याला रक्कम रुपये ६५,०००/– पगार आहे. तसेच सामनेवाला नं.२ हा मुंबई महानगर पोलिकेतुन निवृत्त असून त्यांना रक्कम रुपये २५,०००/– निवृत्ती वेतन मिळते. मुळ अर्जाचा निकाल होण्यास बराच कालावधी लागणार आहे. त्यामुळे अर्जदार नं.२ याच्या पालन पोषणासाठी दरमहा रक्कम रुपये १५,०००/– सामनेवाला नं.१ याने द्यावेत

असा त्यांना अंतरिम आदेश करण्यात यावा अशी विनंती अर्जदार नं .१ हिने केली आहे. अर्जदार यांनी पुरशिस दाखल करुन परिच्छेद नं. २४–अ व २४–इ मधील मागण्या या अर्जापुरत्या सोडून दिल्या आहेत.

६. सामनेवाला क्र. १ व २ यांनी नि. १२ कडे आपले म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत घेतली आहे. सामनेवाला यांचे कथन की, अर्जदार हिने सामनेवाला यांचेवर खोटे, खोडसाळ व बिनबुडाचे आरोप केलेले आहेत . सामनेवाला यांचे कथन की, अर्जदार नं. १ व सामनेवाला नं. १ यांचा विवाह झाल्यानंतर ते सुरुवातीचे काही दिवस गांवी मौजे हेदुळ, ता. मालवण येथे होते. त्यानंतर ते डोंबिवली येथे राहू लागले. तसेच सदर खोलीवर सामनेवाला क्र.१ यांचे वडील, आई व भाऊ रहात असत. अर्जदार नं.१ व सामनेवाला नं.१ यांचे सुरुवातीचे काही दिवस चांगले गेले. तसेच अर्जदार नं.१ हिचा भाऊ ललित हा देखील शिक्षणासाठी सामनेवाला यांचे रुमवर साधारण एक वर्ष रहात होता . त्याचा सर्व खर्च सामनेवाला क्र .१ हाच करत होता. सामनेवाला क्र.१ याला नाटकाची आवड असल्यामुळे तो आपली नोकरी संभाळून सुट्टीच्या दिवशी पुरी करतो. याबाबत अर्जदार नं.१ हिला लग्नापूर्वीच सांगितले होते. सामनेवाला क्र.१ व अर्जदार नं.१ यांचेमधील व्यवहार हे सरळ होते. सामनेवाला क्र.१ हा त्यांच्या पगारातील तसेच शेअर मार्केटमधून मिळणा–या नफ्यातील पैसे अर्जदार नं.१ हिला रोख स्वरुपात किंवा तिच्या बँक खात्यात ट्रान्सफर करीत असे . सन २०१६ पासून सन २०२० पर्यंत सामनेवाला क्र.१ याने अर्जदार नं.१ हिचे खात्यात एकूण रक्कम रुपये ३०,०४,८३०/– एवढी ट्रान्सफर केलेली आहे. त्याने रोख स्वरुपात दिलेल्या रक्कमेचा हिशोब ठेवलेला नाही. सामनेवाला याने दिलेल्या पैशातील रक्कम अर्जदार ही सामनेवाला जेव्हा अडचणीत असेल तेव्हा देत असे. सामनेवाला अर्जदार हिस कोणतीही रक्कम देणे लागत नाही. अर्जदार

नं.१ हिला जोपर्यंत सामनेवाला क्र.१ याचेकडून पैसे मिळत होते तोपर्यंत ती व्यवस्थित नांदत होती. सामनेवाला क्र.१ हा आर्थिक अडचणीत सापडल्याने अर्जदार नं.१ ही सामनेवाला क्र.१ याचा त्याग करुन स्वतंत्र रहात आहे.

७. सामनेवाला यांचे पुढे असे कथन आहे की, अर्जदार क्र.२ याचा जन्म झाल्यानंतर सामनेवाला तसेच त्यांची आई यांनी तिची चांगल्याप्रकारे काळजी घेतली आहे. तिला माहेरी जाण्यापासून कधीही रोखलेले नाही . सामनेवाला क्र.२ हे अर्जदार क्र.१ हिला आपल्या मुलीप्रमाणे वागणुक देत असत. अर्जदार हिने मे २०१६ मध्ये अर्जात नमुद केलेली घटना पूर्णतः खोटी व खोडसाळ आहे. अर्जदार क्र.१ हिच्या नांवावर लग्नाअगोदर शैक्षणिक कर्ज होते. लग्नानंतर ते कर्ज अर्जदार क्र .१ हिने तिचे वडीलांच्या सांगण्यावरुन सोसायटीमध्ये ट्रान्सफर केले. त्यानंतर इनकम टॅक्समधील लाभ मिळणेकरीता सामनेवाला क्र.१ व अर्जदार क्र.१ यांनी मिळून ओरोस येथे फ्लॅट बुक केला. सदर फ्लॅटचे हप्ते अर्जदार नं.१ च्या खात्यातुन जात असले तरी सामनेवाला क्र.१ हा तिच्या खात्यात हप्त्याचे पैसे ट्रान्सफर करत होता. सदरचे हप्ते तो नियमित भरत होता. परंतु नंतर कोरोना महामारीमुळे सदरचे हप्ते भरणे त्याला अवघड होवू लागले. त्याच दरम्याने अर्जदार क्र.१ हि सामनेवाला क्र.१ याच्याशी भांडण काढून विभक्त राहू लागली व सामनेवाला यांचेविरुध्द महिला अत्याचार निवारण केंद्राकडे खोटी व खोडसाळ तक्रार दाखल केली. सामनेवाला क्र.२ यांनी त्यांचा मुलगा नितेश याच्यासाठी घेतलेली गाडी ही त्यांनी स्वतःच्या पत्नीचे दागिने गहाण ठेवून तसेच त्यांच्याकडील पेन्शनच्या पैशातील शिल्लक रक्कम वापरुन घेतली आहे. सामनेवाला क्र. १ हे वडील या नात्याने अर्जदार क्र.२ बाबतची सर्व कर्तव्ये पार पाडीत होते व आहेत. डोंबिवली येथे चांगल्या

शाळेची सोय असताना अर्जदार नं.१ हिने हट्टाने अर्जदार नं.२ यांस कांजुरमार्ग येथे शाळेत प्रवेश घेतला व त्यानंतर ओरोस येथे डॉन बॉस्को शाळेत दाखल केले. नोव्हेंबर २०२० च्या दरम्यान अर्जदार नं.१ व सामनेवाला नं.१ हे गांवी आले होते व त्यानंतर सामनेवाला क्र.१ हा गांवी परत जाताना त्याने त्याची बहिण रेश्मा हिच्या मुलाला सोबत घेतले व त्याला त्याच्या आईकडे पाठवायचे आहे असे सांगितले. परंतु सदर गोष्टीचा अर्जदार हिस राग येवून ती स्वतःहून सामनेवाला यांचेपासून वेगळी रहात आहे व तिने अर्जदार नं.२ यास तिच्या माहेरी ठेवले आहे. सामनेवाला क्र.१ व २ हे तिच्या माहेरी अर्जदार नं.२ यास भेटण्याकरीता व अर्जदार नं.१ हिची समजुत घालण्याकरीता गेले असता अर्जदार क्र.१ हिने ''मला तुमच्याशी कोणत्याही प्रकारचे संबंध ठेवायचे नाहीत, तुम्ही मला घटस्फोट द्या '' असे सांगू लागली व अर्जदार नं.२ यास भेटण्यास अटकाव केला. तसेच सामनेवाला क्र.१ ची बहिण स्वतंत्र रहात असून तिच्याबाबत अर्जदार हिने केलेले आरोप हे खोटे व खोडसाळ आहेत.

८. अर्जदार हि स्टाफ नर्स असून ति अर्जदार नं.२ कडे पूर्ण लक्ष देऊ शकत नाही. त्यामुळे तिने त्याला माहेरी ठेवलेले आहे. सामनेवाला हा आजही त्याच्या मुलाची जबाबदारी स्विकारण्यास तयार आहे. सामनेवाला क्र.१ हा त्याच्या पालनपोषणासाठी दरमहा खर्चाची रक्कम अर्जदार नं.१ हिचे खाती जमा करत होता व आजही जमा करत आहे. अर्जदार हिने ओरोस येथील महिला अत्याचार निवारण केंद्राकडे सामनेवाला यांचेविरुध्द तक्रार केली होती. त्यावेळी ओरोस येथील सदनिका विकुन कर्ज फेड करण्याचे त्यांच्यात ठरले होते. परंतु अर्जदार नं.१ हिने सदर सदनिकेची कागदपत्रे देण्यास नकार दिला. त्यामुळे सदरचा व्यवहार होवू शकला नाही. सामनेवाला क्र.१ यास दरमहा

रक्कम रुपये ६५,४८६/– एवढा पगार असून त्यातुन वजावाट होवून रुपये ५७,५२६/– एवढा पगार मिळतो. त्यातून त्याला एच्.डी. एफ्.सी. बँकेची वैयक्तीक कर्ज, गृह कर्ज व क्रेडीट कार्डची कर्ज भरावी लागतात . तसेच सामनेवाला क्र.१ यास मधुमेह असून त्याचा औषधोपचाराचा खर्च येतो . त्यामुळे त्यास ओरोस येथील सदनिकेचे हप्ते भरणे शक्य होत नाही . याउलट अर्जदार क्र.१ हिस रुपये ७०,०००/– अधिक पगार असून तिचेवर अर्जदार क्र.२ व्यतिरिक्त कोणीही अवलंबुन नाही. सामनेवाला हे अर्जदार क्र.१ कडे ओरोस येथील सदनिकेची चावी देण्यास घेवून गेले असता तिने भेटण्यास नकार दिला. त्यामुळे केवळ रक्कम वसुलीकरीता सदरचा अर्ज दाखल केला असल्याने तो फेटाळण्यात यावा अशी विनंती सामनेवाला क्र.१ व २ यांनी केली आहे.

९. अर्जदारतर्फे विधिज्ञ श्री. एस्. एस्. सावंत यांचा युक्तीवाद ऐकला. तर सामनेवाला यांच्यातर्फे विधिज्ञ श्री. संजय रानडे यांचा युक्तीवाद ऐकला.

१०. दिनांक ०५/०५/२०१५ रोजी अर्जदार क्र.१ व सामनेवाला नं. १ यांचा हिंदु धर्मशास्त्र व रितीरिवाजाप्रमाणे विवाह झाला आहे ही बाब दोन्ही पक्षांना मान्य आहे.

११. घरगुती हिंसाचार कायद्याप्रमाणे कलम २३ च्या अर्जाचा विचार करता अर्जदाराने प्रथमदर्शनी तिच्यावर घरगुती हिंसाचार झाला ही बाब दाखविणे महत्वाचे आहे. अर्जदार हिने अर्जामध्ये लग्नानंतर तिचे व सामनेवाला नं. १ यांचे दरम्यान घडलेल्या प्रसंगाचे कथन केलेले आहे. तसेच सामनेवाला यांनी ओरोस येथे फ्लॅट बुक करुन अर्जदार हिचे नांवावर कर्ज घ्यावयास लावले. तसेच डोबिंवली येथे सामनेवाला यांनी फ्लॅट घेतला असल्यामुळे तेथील फ्लॅटचा कर्जाचा हप्ता सामनेवाला क्र.१ हे भरत होते त्यामुळे घरातील सर्व खर्च

अर्जदार यांना करावा लागत असे. तसेच सामनेवाला क्र.२ देखील अर्जदार हिचेकडे पैशाची मागणी करीत असत. तसेच सामनेवाला क्र.२ यांनी त्यांचा मुलगा नितेश याला गाडी घेण्यासाठी अर्जदार हिचे मंगळसुत्र गहाण ठेवले व अर्जदार क्र. १ हिने सोसायटीमधून रक्कम रुपये २,००,०००/– इतके कर्ज घेवून सामनेवाला क्र.२ यांना दिले. त्यानंतर सामनेवाला क्र.१ याने त्याचे कंपनीमध्ये रक्कम रुपये २५ ,००,०००/– चा अपहार केला. त्यावेळी अर्जदार हिने तिचे बचत खात्यातील रक्कम रुपये २,००,०००/–सामनेवाला क्र.१ यास दिले व त्यानंतर रक्कम रुपये ८,००,०००/– कर्ज काढून, रक्कम रुपये २,००,०००/– मैत्रिणीकडून घेवून व रक्कम रुपये १,००,०००/– एस्. आय.पी. मोडून सदरची सर्व रक्कम सामनेवाला क्र.१ याचे खात्यामध्ये जमा केली. अशाप्रकारे सामनेवाला क्र.१व २ यांनी अर्जदार क्र. १ हिचे वेळोवेळी आर्थिक शोषण केलेले आहे. सदरची बाब दाखविण्यासाठी अर्जदाराने तिचे शपथपत्र दाखल केलेले आहे . शपथपत्रामध्ये अर्जदाराने सामनेवाल्याने तिच्याविरुध्द केलेल्या घरगुती हिंसाचाराचे व आर्थिक शोषणाचे कथन केलेले आहे.

१२. अर्जदारतर्फे विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, अर्जदार क्र.१ ही स्टाफ नर्स असून ती सध्या रक्कम रुपये ८२ ,०००/– प्रतिमहिना कमवत आहे. परंतु सामनेवाला क्र. १ व २ यांनी वेळोवळी अर्जदार हिचेकडे पैशाची मागणी केली त्यावेळी तिने कर्ज काढून पैशाची मागणी पूर्ण केली. अर्जदार हि सदर कर्जाचे हप्ते फेडत असल्यामुळे तिला तिचे स्वतःचे व मुलाचे पालन पोषण करण्यास पुरेशी रक्कम हातामध्ये रहात नाही. त्यामुळे अर्जदार हिचे आर्थिक शोषण होत आहे व आर्थिक शोषण हे देखील घरगुती हिंसाचाराच्या व्याख्येत

बसत असून अर्जदार क्र.२ याचे पालन पोषणाची जबाबदारी ही अर्जदार क्र.१ व सामनेवाला क्र.१ या दोघांचीही आहे. सध्या अर्जदार क्र. २ याचे पालन पोषण हे केवळ अर्जदार क्र.१ हिच करत असून तिच्यावरील कर्जाच्या हप्त्यांमुळे सदरची जबाबदारी ती एकटी पार पाडू शकत नाही. सबब अर्जदार क्र. २ याचे पालन पोषणासाठी सामनेवाला क्र .१ यांना प्रतिमहिना रक्कम रुपये १५,०००/– पोटगी देण्याचे आदेश व्हावेत.

१३. सामनेवालातर्फे विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की , सामनेवाला क्र.१ हे वडील या नात्याने अर्जदार क्र.२ याचे बाबतीत सर्व कर्तव्ये पार पाडीत आहेत. परंतु अर्जदार क्र.१ आपल्या हट्टाने कांजुरमार्ग येथे भाड्याने घेतलेल्या खोलीत रहाण्यासाठी गेली व ती स्वतःहून सामनेवालापासून विभक्त रहात आहे. तसेच अर्जदार हिने सामनेवाल्यास कोणतीही कल्पना न देता मुलगा स्वबोध यास आपल्या माहेरी कसाल येथे आई वडीलांकडे ठेवलेले आहे. तसेच अर्जदार क्र.१ हिने सामनेवाला क्र.१ याच तिचेशी कोणत्याही प्रकारे संबंध ठेवायचे नाही असे सांगून मुलगा स्वबोध यांस देखील भेटण्यास अटकाव केला व मुलगा स्पबोध यास पित्याचे प्रेमापासून वंचित ठेवलेले आहे. सामनेवाला क्र.१ हे वर्क फ्रॉम होम नोकरी करीत असल्यामुळे मुलाची चांगल्या प्रकारे काळजी घेवू शकतात. सामनेवाला यांनी अर्जदार क्र.१ हिचा कोणत्याही प्रकारचा शारीरीक, मानसिक व आर्थिक छळ केलेला नाही. सामनेवाला क्र.१ याने अर्जदार हिस वेळोवेळी रक्कमा दिलेल्या असून त्याच रक्कमेतील काही रक्कम अर्जदार क्र.१ हिने सामनेवाला क्र.१ यास दिलेली आहे. सामनेवाला क्र.१ हा अर्जदार हिस कोणतेही देणे लागत नाही. सबब अर्जातील मागण्या फेटाळण्यात याव्या अशी विनंती केली आहे.

१४. अर्जदार हिने कौटुंबिक हिंसाचाराबाबत व आर्थिक शोषणाबाबत नमुद केलेल्या घटना मुळ अर्जाच्याकामी पुराव्याअंती शाबीत होणा–या आहेत. सामनेवाला नं. १ याने अर्जदार हिचेशी असलेले वैवाहिक संबंध नाकारलेले नाहीत. तसेच अर्जदार क्र.२ याचे पालकत्व देखील नाकारलेले नाही. त्यामुळे अर्जदार क्र.२ याचे पालन पोषणाची जबाबदारी अर्जदार क्र .१ इतकीच सामनेवाला नं.१ याची देखील आहे.

१५. अर्जदार क्र.१ हिच्या अभिकथनानुसार सामनेवाला नं.१ हा आय. टी. कंपनीत नोकरी करत असून त्याला रक्कम रुपये ६५ ,०००/– पगार आहे. तसेच सामनेवाला क्र.२ हे मुंबई महानगरपालिकेतुन निवृत्त झाले असून त्यांना रक्कम रुपये २५ ,०००/– निवृत्ती वेतन मिळते. मा. सर्वोच्च न्यायालयाने ***रजनीश वि. नेहा व इतर, क्रिमीनल अपील नं. ७३०/२०२०*** याकामी दिलेल्या निर्देषानुसार अर्जदार हिने आपले मालमत्ता व दायित्वाचे प्रतिज्ञापत्र नि. १६ कडे दाखल केले आहे व सामनेवाला क्र .१ याने आपले मालमत्ता व दायित्वाचे प्रतिज्ञापत्र नि. १३ कडे दाखल केले आहे. सदर प्रतिज्ञापत्रावरुन असे दिसून येते की, अर्जदार नं.१ ही स्टाफ नर्स असून तिचे मासिक वेतन रुपये ८२,८८७/– इतके आहे. तसेच तिच्यावर घरकर्ज व डी. एम्. ई. आर. सोसायटीचे कर्ज असून सर्व वजावाटी होवून तिला रक्कम रुपये ४७,६०१/– मिळतात. सामनेवाला क्र.१ यास मासिक वेतन रक्कम रुपये ६५,४८६/– असून वजावाटी होवून त्याला रक्कम रुपये ५७,५२६/– इतकी रक्कम मिळते. त्यांचा वैयक्तीक खर्च रक्कम रुपये १०,०००/– असून त्याचे मधुमेह आजारासाठी रक्कम रुपये ५००० /– इतका खर्च येतो . सामनेवाला क्र.१ यांनी त्यांचे म्हणण्यामध्ये एच्. डी. एफ्. सी. बँकेच्या कर्जाचा

हप्ता रुपये ४० ,६५९/–, गृहकर्जाचा हप्ता रुपये १६ ,०००/– असल्याचे कथन केले आहे. परंतु त्यांच्या प्रतिज्ञापत्रामध्ये त्या बाबींचा उल्लेख केलेला नाही. सामनेवाला यांनी नि. १५ सोबत त्यांचे कर्ज खातेउतारा दाखल केलेला आहे.

१६. वरील सर्व बाबींचा विचार करता अर्जदार क्र.१ व सामनेवाला क्र.१ यांचा विवाह झालेबाबतची बाब नाकारलेली नाही . तसेच अर्जदार क्र.२ हा अर्जदार क्र. १ व सामनेवाला क्र.१ यांचा मुलगा आहे, ही बाब देखील दोघांना मान्य आहे. अशा परिस्थितीत, अर्जदार क्र. २ याच्या शिक्षण व पालनपोषणाची जबाबदारी ही अर्जदार क्र. १ व सामनेवाला क्र.१ या दोघांचीही आहे. सध्या अर्जदार क्र. २ हा अर्जदार क्र.१ यांचेसोबत रहात असून त्यांचे शिक्षण व पालनपोषणाची जबाबदारी अर्जदार क्र.१ हया पार पाडत आहेत, असे दिसून येत आहे. सामनेवाला यांनी अर्जदार क्र. २ यांचे शिक्षण, पालनपोषण, कपडालत्ता, औषधपाणी या बाबत कोणती तरतूद केली याबाबत सामनेवाला नं. १ याने त्याचे म्हणणे (नि. १२) मध्ये काहीही उल्लेख केलेला नाही . त्यामुळे सामनेवाला क्र.१ याची अर्जदार क्र. २ याला सांभाळण्याची जबाबदारी असताना सामनेवाला यांनी ती जबाबदारी पार पाडलेली नाही . अर्जदार क्र.१ हिचे मालमत्ता व दायित्वाचे प्रतिज्ञापत्रावरुन तिचे मासिक वेतन रक्कम रुपये ८२,८८७/– इतके असून वजावाटी होवून तिला रक्कम रुपये ४७,६०१/– मिळतात. सदर रक्कमेतुन तिचे प्रवास खर्च, मुलाचे शिक्षण असे इतर खर्च देखील तिला करावे लागतात, असे दिसून येते. सामनेवाला क्र.१ याचे मासिक वेतन रक्कम रुपये ६५,४८६/– असून वजावाटी होवून त्याला रक्कम रुपये ५७,५२६/– इतकी रक्कम मिळते. तसेच त्याचा वैयक्तीक खर्च, वैद्यकीय खर्च व कर्जाचे हप्ते जावून सामनेवाला क्र .१ याचेकडे निश्चित किती रक्कम शिल्लक रहाते, याबाबत कोणताही ठोस पुरावा अभिलेखावर नाही. तथापी अर्जदार क्र. २ याचे पालनपोषणाची जबाबदारी ही अर्जदार क्र . १ व

सामनेवाला क्र.१ या दोघांचीही आहे. सामनेवाला व अर्जदार क्र.१ यांचे उत्पन्न, त्यांचे राहणीमान, दोघांच्यावर असलेली जबाबदारी, जीवनावश्यक वस्तुंची वाढती महागाई, याचा सारासार विचार करता सामनेवाला याने अर्जदार क्र. २ यास पोटगी करिता रुपये ७ ,०००/- प्रति महिना अशी अंतरिम पोटगी मंजूर करणे न्यायोचित होईल, या निष्कर्षापर्यंत मी आले आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

२. सामनेवाला नं.१ यास असे आदेशीत करण्यात येते की, त्याने अर्जदार नं. २ यांना अंतरिम पोटगी म्हणून प्रतिमहिना रुपये ७०००/- (रुपये सात हजार मात्र) इतके या आदेशापासून अंतिम निर्णयापर्यंत अगर पुढील आदेश होईपर्यंत द्यावेत.

३ या अर्जाचा खर्च रक्कम रुपये २००० /- (रुपये दोन हजार मात्र) इतका सामनेवाला नं.१ याने अर्जदार यांना द्यावा.

४. या आदेशाची प्रत अर्जदार व सामनेवाला यांना मोफत दयावयाची आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by ASHWINI JOTIRAM BACHULKAR
Date: 2022.11.26 17:47:36 +0530

(अ. जो. बाचुळकर )

दिनांकः-०१/१२/२०२२ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,

कुडाळ.